## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.

दिनांक. 28.02.2017 रोजी दुपारी 03.00 वाजता नांवामनपा स्थायी समितीची अंदाजपत्रकिय विशेष सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. देशमुख मंगला गजानन, सभापती**

**सर्वश्री**

| | |
|---|---|
| तेहरा अनुजा अमितसिंह | फारुख हुसेन कासीम साब |
| जकीया बेगम स. मुखतार | इशरत फातेमा अ. शमीम |
| कदम गंगाबाई नारायण | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| मोकले सोनाबाई रामचंद्र | स. जानी म. कासीम |
| चिखलीकर संदिप सुभाषराव | कल्याणकर बालाजी दत्तराव |
| गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल | अंजुम बेगम शेख अफरोज |

**सभापती** — उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य, मा. आयुक्त, उपआयुक्त (विकास) श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त (महसुल) तथा मुख्यलेखाधिकारी श्री कंदेवाड, मुख्य लेखा परिक्षक श्री आर.एस.कोलगणे, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन अंदाजपत्रकिय विशेश सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**आयुक्त** — अंदाजपत्रकीय विशेष सभेमध्ये साल सन 2017-18 चे बजेट मा. सभापती ( स्थायी समिती ) यांना सादर करुन आपले मनोगत वाचुन दाखविले.

**उमेश चव्हाण** — मा. आयुक्तांनी साल सन 2017-2018 चे बजेट अत्यंत चांगल्या रितीने सादर केले आहे. त्यामुळे मी त्यांचे हार्दिक स्वागत करतो तसेच सन 2016-17 चे सुधारीत अंदाजपत्रक या ठिकाणी सादर केले आहे. या अर्थसंकल्पात आम्हाला सुधारणा सुचवावयाच्या आहेत तसेच आम्हाला अभ्यास करण्यासाठी वेळ देण्यात यावा.

**तुलजेस यादव** — श्री उमेश चव्हाण यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे. आम्हाला अभ्यास करण्यासाठी वेळ देण्या बाबतचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**सभापती** — सदस्यांना अंदाजपत्रकावर अभ्यास करण्यासाठी वेळ देण्यात येते. व आजची अंदाजपत्रकीय विशेष सभा सर्वानुमते तहकुब करण्यात येते.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **सभापती** |
| नावाशमनपा नांदेड | स्थायी समिती |
| | नावाशमनपा नांदेड |